आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
३ डिसेंबर २०२४ - मंगळवार

- **ठळक बातम्या**
- दिव्यांग जनांचा सार्वजनिक वावर सोयीचा व्हावा तसंच, त्यांना समान वागणूक दिली जावी हे सर्वांचं कर्तव्य आहे, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- दिव्यांगजनाच्या समावेशनासाठी सुरु केलेल्या सुगम्य भारत अभियानाला ९ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम

- नवीन फौजदारी कायद्यांमुळे वसाहतवादाच्या मानसिक गुलामगिरीतून भारतीयांनी मुक्ती मिळाल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- अदानी उद्योग समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण, संभल हिंसाचार आणि इतर मुद्यांवरून निदर्शनं करत संसदेत विरोधी पक्ष सदस्यांचा सभात्याग

**आणि**

- फेंजल चक्रीवादळामुळं पुद्दुचेरी आणि तामिळनाडूत जनजीवन विस्कळीत/ आतापर्यंत २४ जणांचा मृत्यू

**<><><><>**

दिव्यांग जनांचा सार्वजनिक वावर सोयीचा व्हावा तसंच, त्यांना समान वागणूक दिली जावी हे सर्वांचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी

मुर्मू यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय दिव्यांग जन दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीचे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर त्या बोलत होत्या. दिव्यांगांना कोणत्याही अडथळ्याशिवाय जगता येणं हा समाजासाठी प्राधान्यक्रम असायला हवा. ज्या समाजात दिव्यांगाना समान संधी आणि वागणूक मिळेल तोच समाज प्रगत समाज असतो. याच उद्दिष्टानं सुगम्य भारत या अभियानाची वाटचाल सुरू आहे, असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या....

**होल्ड - बाईट - राष्ट्रपती**

आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आले. या पुरस्कार विजेत्यांमध्ये महाराष्ट्रातले प्रियांका दाभाडे, कनिका अग्रवाल, प्रथमेश सिन्हा या तिघांचा तसंच सेंट झेवियर्स महाविद्यालयाचा समावेश आहे.

**<><><><>**

सार्वजनिक इमारती, प्रवासाची साधनं, तसंच माहिती तंत्रज्ञान यंत्रणा दिव्यांगांच्या वापरासाठी सुकर करण्याच्या उद्देशानं दिव्यांग सशक्तीकरण विभागानं सुरू केलेल्या सुगम्य भारत अभियानाला आज ९ वर्षं पूर्ण होत आहेत. या निमित्ताने, मुंबईच्या अली यावर जंग राष्ट्रीय वाचा आणि श्रवण दिव्यांगजन संस्थेच्या ऑडिऑलॉजिस्ट आणि स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजिस्ट गौरी तेलंग यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं,

**होल्ड--बाइट--(गौरी तेलंग).**

**<><><><>**

**सोलापूर** जिल्ह्यातल्या पात्र दिव्यांग व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना दिव्यांग प्रमाणपत्र घरपोच देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीनं मिशन अस्मिता हे अभियान सुरु करण्यात आलं आहे. या अभियानातून जवळपास १५ हजार १५८ दिव्यांग व्यक्तीची प्राथमिक तपासणी करण्यात आली असून त्यापैकी १२ हजार ६६६ दिव्यांग प्रमाणपत्रासाठी पात्र ठरले आहेत. त्यांना लवकरच हे प्रमाणपत्र घरपोच देण्यात येणार आहेत.

**सांगली** जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या वतीनं देखील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचं आणि त्यांनी बनवलेल्या आकर्षक वस्तूंच्या प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमात जिल्ह्यातल्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या ३६ शाळांनी भाग घेतला.

**<><><><>**

नवीन फौजदारी कायद्यांमुळे ब्रिटीश कायद्यांमधून वसाहतवादाच्या मानसिक गुलामगिरीतून भारतीयांनी मुक्ती मिळाल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचं लोकार्पण केल्यानंतर आज हरियाणात चंडीगढ इथं ते बोलत होते. काम त्यांची संहिता तयार करण्याइतकंच अवघड आणि अभ्यासपूर्ण होतं असं ते म्हणाले. या कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणी निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांचं अभिनंदन केलं. या कार्यात योगदान देणाऱ्या सर्व व्यक्ति आणि

संस्थांचे त्यांनी आभार मानले हे तीन कायदे देशाच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासातला मैलाचा दगड ठरतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यापूर्वी नव्या फौजदारी कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणीतील प्रगतीबद्दलचं सादरीकरण त्यांनी पाहिलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा त्यांच्यासोबत होते. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम या तीन नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीला यावर्षी १ जुलैपासून सुरूवात करण्यात आली.

<><><><>

अदानी उद्योग समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण, संभल हिंसाचार आणि इतर मुद्यांवरून निदर्शनं करत लोकसभेत विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आज सभात्याग केला. सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या मुद्यावर प्रश्न विचारायला सुरुवात केली. मात्र हे मुद्दे शून्य प्रहरात उपस्थित करावेत, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी त्यांना सांगितलं. त्यामुळे काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुुक आणि इतर पक्षाच्या खासदारांनी गदारोळ करत सभात्याग केला.

राज्यसभेतही समाजवादी पार्टीचे खासदार रामगोपाल यादव यांनी संभल हिंसाचारप्रकरणी प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर समाजवादी पार्टी आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी सभात्याग केला.

<><><><>

मनरेगा अर्थात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या निधीत गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षात सरकारनं मनरेगासाठी अर्थसंकल्पात ८७ हजार कोटी रुपयांची तरतूद केली, अशी माहिती ग्रामविकास राज्यमंत्री डॉक्टर चंद्रशेखर पेम्मासनी यांनी लोकसभेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना दिली. कोविड महामारीच्या काळात मनरेगासाठी एक लाख दहा हजार कोटी रुपये खर्च करण्यात आला, गेल्या पाच वर्षात मजुरीतही ४३ टक्क्यांनी वाढ झाली आहे, त्यामुळे मजुरीत घट झाल्याचा आरोप तथ्यहीन असल्याचं चंद्रशेखर यांनी सांगितलं.

**<><><><>**

विणकरांच्या कल्याणासाठी सरकार सातत्यानं काम करत असल्याने राष्ट्रीय विणकर आयोग स्थापन करण्याचा कोणताही विचार नसल्याचं वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. विणकरांसाठी आर्थिक मदतीसह लघु क्लस्टर विकास कार्यक्रम, हातमाग विपणन सहाय्य आणि हातमाग विणकर कल्याण अशा अनेक योजना सरकार राबवित असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

फेंजल चक्रीवादळामुळं पुद्दुचेरी आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्ये अतिवृष्टी आणि पूर आला असून, जनजीवन विस्कळीत झालं आहे. अतिवृष्टीमुळे तामिळनाडूत तिरुवन्नामलाई इथं दरड कोसळून सात जणांचा मृत्यू झाला. तर पुरामुळं पुद्दुचेरीमध्ये चौघांचा मृत्यू झाला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्याशी पूरपरिस्थितीबाबत दूरध्वनीवरून चर्चा केली, आणि सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन दिलं.

फेंजलचा परिणाम म्हणून केरळातही मुसळधार पाऊस होत आहे.

**<><><><>**

४३व्या कनिष्ठ गट राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलांच्या आणि मुलींच्याही संघानं सुवर्णपदक जिंकत आपलं वर्चस्व अबाधित राखलं आहे. मुलांच्या संघानं या स्पर्धेच्या इतिहासातला ३५ वा विजय नोंदवत त्यांचा सलग १९ वा विजय साजरा केला, तर मुलींच्या संघानं सलग दहावं आणि एकूण २६ वं विजेतेपद पटकावलं. मुंबईच्या महाराणी अहिल्याबाई होळकर क्रीडा स्टेडियमवर या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत जितेंद्र वसावे आणि सुहानी धोत्रे यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल वीर अभिमन्यू आणि जानकी पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

**<><><><>**

राज्यात सत्ता स्थापनेच्या दृष्टीने विविध पक्षांच्या नेत्यांच्या भेटीगाठी आणि चर्चा सुरू आहेत. राज्यात भाजप विधिमंडळ गटनेता निवडीसाठी पक्षानं गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ पक्षाची बैठक उद्या ४ डिसेंबरला होणार असून त्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठीच्या नावाची औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, मुंबईत आझाद मैदानावर शपथविधी सोहळ्याची जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे. शपथविधीच्या तयारीचा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आढावा घेतला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, इतर केंद्रीय मंत्री, तसंच राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना  या कार्यक्रमाचं आमंत्रण आहे. त्याखेरीज साधू महंत, कलाकार, आणि साहित्यिकांनाही निमंत्रित केलं जाणार आहे.

**//<><><><>//**